# आदि शक्ति आणि नारी

भारतीय संस्कृतीत नारीचे गौरवपूर्ण पूज्य स्वरूप व आदि शक्ति देवीच्या रूपात सर्व गुण सम्पन्न स्वरूप विशेष प्रतिष्ठित आहे. यात तपस्येची देवी उमा, धनाची देवी लक्ष्मी, ज्ञानाची देवी सरस्वती व शक्तीची देवी दुर्गा मुख्य आहेत.

आजची नारी याच शक्तींची वंशज आहे परंतु भौतिक व आध्यात्मिक गुणांचे जे संतुलन आदि देवीत आहे, त्याचा आजच्या नारीमध्ये सर्वथा अभाव दिसून येतो. एक पक्षीय अनुसरणाच्या संदर्भात, भौतिक क्षेत्रात तिने एकाहून एक मोठी उंची गाठली आहे परंतु दुसरा पक्ष आध्यात्मिक मूल्यांची अवहेलना केल्याने तिचा हा प्रयत्न पूर्ण सकारात्मक परिणाम देत नाहीये.

वर्तमान नारीसुद्धा आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी ईश्वर भक्ती करते. कुलळवधूच्या रूपात घर परिवाराला धन धान्याने सम्पन्न करण्याच्या प्रयत्नामुळे तिला लक्ष्मी पद प्राप्त आहे. माता सरस्वतीची वारसदार बनून आज ती शिक्षण व अध्ययनाच्या क्षेत्रात मोठमोठ्या पदव्या प्राप्त करीत आहे. माँ दुर्गेचे अनुसरण करीत सैन्यदल व पोलिस दलात आपले योगदान देऊन ती देशाचे शत्रू व असामाजिक तत्वांचा नाश करण्यात सुद्धा महत्वपूर्ण भूमिका निभावित आहे.

परंतु तरी सुद्धा तिच्यात आदि शक्तिच्या तुलनेत दिव्यता, पवित्रता आणि गुण सम्पन्न स्थितीचा अभाव आहे. आता प्रश्न उठतो की तिच्यात हे दिव्यगुण कोठून येणार? या आदि शक्तींना कोणी या गुणांनी सजविले होते? त्याच आध्यात्मिक वैभवाला पुन्हा विकसित करण्याची आवश्यकता आहे.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com